# पुणे विद्यापीठ

**परिपत्रक क्रमांक : २२९/२०१३**

पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/विद्यापीठ विभागातील विज्ञान विद्याशाखा आणि विज्ञानेतर विद्याशाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या **विद्यार्थीनीस** दरवर्षी आलटून–पालटून **''त्यागमूर्ती श्रीमती सरस्वती रामचंद्र शेलार सुवर्णपदक''** प्रदान करण्यात येते. सन २०१३–१४ मध्ये विज्ञान विद्याशाखेच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थीनीस विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभात हे सुवर्णपदक प्रदान करण्यात येणार आहे.

या परिपत्रकाद्वारे सर्व विद्यापीठ विभागप्रमुख/प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की,**''त्यागमूर्ती श्रीमती सरस्वती रामचंद्र शेलार सुवर्णपदक''** साठी खाली उल्लेख केलेल्या नियम व अटी नुसार विद्यार्थीनीची माहिती आवश्यक कागदपत्रे व शिफारशीसह **दिनांक ९ नोव्हेंबर, २०१३ पूर्वी** शैक्षणिक प्रवेश विभाग, पुणे विद्यापीठ येथे प्रत्यक्ष (हस्तपोच) सादर करावे.

**नियम व अटी :**

१) सदर पारितोषिक शैक्षणिक वर्ष २०१२–१३ मध्ये विज्ञान विद्याशाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये विषेश गुणवत्ता प्राप्त केलेल्या एका विद्यार्थीनीस प्रदान करण्यात येईल.
२) इयत्ता दहावी, बारावी व पदवी परीक्षेतील गुण हे प्रथम वा द्वितीय क्रमांकाच्या पात्रतेचे असावेत.
३) विद्यार्थीनी भारतीय संस्कृती, आचार, विचार, भारतीय परंपरा मानणारी व स्वत:च्या दैनंदिन जीवनात आचरण करणारी असावी.
४) विद्यार्थीनी सर्व भारतीय व परदेशी क्रीडा तसेच वैयक्तिक व सांघिक अशा क्रीडा स्पर्धांमध्ये जास्तीतजास्त पारिताषिके मिळविलेली असावी. यामध्ये ध्यानधारणा, प्राणायम, योगासने करणाऱ्या विद्यार्थीनीस प्राधान्य दयावे.
५) गायन, नृत्य, वक्तृत्व, नाटय व इतर कलांमध्ये नैपुण्य प्राप्त केलेली असावी.
६) रक्तदान, श्रमदान, पर्यावरण रक्षण व प्रदूषण नियंत्रण कार्य, साक्षरता व स्वच्छता मोहीम तसेच एड्स रोगाविरूध्द जनजागरण मोहिम इ. मध्ये सहभाग असावा.
७) विद्यार्थीनी शाकाहारी व निर्व्यसनी असावी.
८) पदव्युत्तर अभ्यासक्रमातील विद्यार्थीनी उपलब्ध नसल्यास पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थीनीचा विचार करण्यात येईल.
९) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थीनीला अध्यादेश क्र. १०९, ११० व १४३ ची पूर्तता करणे आवश्यक आहे.
१०) अध्यादेश क्र. १६८ नुसार परीक्षेस बसणारी विद्यार्थीनी सुवर्णपदकास पात्र ठरणार नाही.

गणेशखिंड,पुणे–७ )
संदर्भ:–शै.प्रवेश/ १९६० )
दिनांक: १६.१०.२०१३ )

१६/१०/२०१३
सहा.कुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग